

# दैनिक आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 66 ■ शनिवार, दि. 12 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006









## लाडक्या बहिणींसाठी खुशखबर! अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ; 'या' तारखेपर्यंत करता येणार अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने लाडकी बहिण योजनेचा अर्ज करण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ज्या महिलांनी अद्याप लाभ मिळालेला नाही त्या आता अर्ज करू शकतात. पालकमंत्री दादा भुसे यांनी याबद्दलची माहिती दिली. राज्य सरकारच्या या निर्णयाने लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना असून याद्वारे पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. आतापर्यंत असंख्य महिलांना या योजनेचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. परंतू, काही अडचणींमुळे अद्याप ज्या महिलांना अर्ज भरता आलेला नाही त्यांना आता मुदतवाढ देण्यात आली आहे. आता १५ ऑक्टोबरपर्यंत लाडकी बहिण योजनेसाठी महिला अर्ज करू शकतात. लवकरात लवकर अर्ज भरून जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास हातभार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनामार्फत समाजातील विविध घटकांच्या उन्नतीसाठी योजना राबविल्या जात आहेत. महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, मोफत उच्च शिक्षण अशा विविध योजना राबविल्या जात असून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास हातभार लावणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.





कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. तत्पूर्वी बंटर भवन कुर्ला येथे शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार मंगेश कुडाळकर, माजी खासदार राहुल शेवाळे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र उद्योग तसेच परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकचे राज्य आहे. राज्यात महिलांबरोबरच शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक आदींसाठी देखील विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद होणार नाही, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यावेळी ऑनलाईन भूमिपूजन तसेच लोकार्पण झालेले प्रकल्प

छेडा नगर उड्डाण पुलाचे लोकार्पण. पूर्व द्रुतगती महामार्गावरील बीकेसी कनेक्टर पासून ते यु टर्न करिता प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन. चुनाभट्टी रेल्वे फाटक वरून प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन. कुर्ला विधानसभा क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण. चुनाभट्टी प्रवेशद्वार व इतर कामाचे लोकार्पण. कामराज क्रीडांगणाच्या सुशोभीकरणाच्या कामाचे लोकार्पण.

टिळक नगर येथील हनुमान मंदिर उद्यान नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचे लोकार्पण. नेहरूनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण मधील नाना नानी पार्क व बालोद्यान याचे नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचा शुभारंभ. कुर्ला विधानसभेमधील रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे शुभारंभ. नेहरूनगर टिळक नगर या म्हाडा वसाहती मधील दुसऱ्या टप्प्यातील मला निसारण महिन्यांच्या कामाचे शुभारंभ. कुर्ला पूर्व रेल्वे स्थानकाजवळ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना याचे लोकार्पण.

## जे जे सोडून गेले त्या प्रत्येकाचा हिशोब होणार

### शरद पवारांकडून ५ मंत्र्यांचा 'कार्यक्रम' करण्यासाठी खास प्लॅन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सोडून गेलेल्या लोकांच्या मतदारसंघात विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह २०२३ मध्ये सोडून गेलेल्या लोकांच्या विरोधात शरद पवारांनी रणनिती आखण्या सुरुवात केली आहे. ज्या मंत्र्यांना कठिण काळात मदत केली, मार्गदर्शन केले त्यांच्या विरोधात उमेदवार देण्यासाठी शरद पवार उत्सुक असल्याचं चित्र आहे. मंत्री छगन भुजबळ, मंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री हसन मुश्रीफ, अर्थमंत्री अजित पवार, माजी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या विरोधात शरद पवारांनी शड्डू ठोकलय.

शरद पवारांनी संबंधित मंत्र्यांच्या मतदारसंघात विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. दिग्गज नेत्यांना आव्हान देण्यासाठी त्यांच्या मतदारसंघात नवे चेहरे उभे केले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या प्रत्येक मतदारसंघात कोणता उमेदवार द्यायचा? याबाबत शरद पवारांचे विशेष लक्ष आहे. पुण्यात त्यांनी १२०० पेक्षा अधिक इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सोडून गेलेल्या लोकांविरुद्ध कडवी झुंज देण्यासाठी भाजपमधल्या अनेकांना पक्षात प्रवेश दिला जातोय. दत्तात्रय भरणे, धनंजय मुंडे ज्यांनी पक्ष फुटल्यानंतर अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याविरोधात शरद पवारांनी खास प्लॅन आखलाय.

राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते आणि खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवारांच्या नव्या रणनीतीवर विश्वास व्यक्त केलाय. पक्षांतरानंतरही कार्यकर्ते आणि मतदार पवार साहेबांच्या पाठीशी आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आम्ही हे पाहिलं आणि मला यावेळीही अशाच वातावरणाची अपेक्षा आहे, असं अमोल कोल्हे म्हणाले आहेत. >> पान २

# ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळा प्रकरणात ईडीची मोठी कारवाई

### सुरेश कुटेंच्या १000 कोटीच्या मालमत्तेवर टाच

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळा प्रकरणात बीड जिल्हा कारागृहात असलेल्या सुरेश कुटे यांनी ठेवीदारांचे पैसे हॉंगकॉंगला नेल्याचे ईडीच्या तपासातून समोर आले होते. यानंतर आता ईडीने मोठी कारवाई केली आहे. ज्ञानराधा मल्टिस्टेट कंपनीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आतापर्यंत १ हजार ९७ कोटींच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पैठण तालुक्यातील विविध गावातील व्यापाऱ्यांनी व सर्वसामान्य खातेदारांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट बॅंकेच्या पैठण शाखेत ज्यादा व्याज देण्याच्या आमिषाला बळी पडून पाच कोटीहून अधिक रक्कम ठेवली होती. मुदत संपून देखील खातेदारांची ठेवलेली ठेव परत मिळत नसल्याने तसेच ही शाखा पैठण मधून बंद केल्याने खातेदारांनी ज्ञानराधा बॅंकेविरुद्ध संस्थापक अध्यक्ष सुरेश कुटे व प्रमुख संचालक पत्नी अर्चना सुरेश कुटे यांच्यासह संचालक मंडळाविरुद्ध रोजी तर्क ार दाखल केली होती.

परदेशातून पैसे येत असल्याचे दिले होते आश्वासन

बीडसह छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, जालना, आदी जिल्ह्यांत ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या ५२ शाखा आहेत. यामध्ये सहा लाखांपेक्षा अधिक ग'ाहक असून, कोट्यवधी रुपयांच्या ठेवी आहेत. ऑक्टोबर २०२३ मध्ये कुटे ग'ुपच्या तिरूमला ग'ुपची आयकर विभागाकडून तपासणी झाली. त्यानंतर ठेवीदारांनी घाबरून ज्ञानराधामधील ठेवी काढून घेतल्या. परंतु मल्टिस्टेटमधील पैसे संपल्याने या ठेवी परत देण्यात कुटे असमर्थ ठरले होते. पैसे परत देण्यासह सुरेश कुटे यांच्यावर कारवाई करण्यासाठी ठेवीदारांनी आंदोलने केली. ठेवीदारांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. गुन्हे दाखल झाल्यानंतरही कुटे यांच्याकडून सोशल मीडियावर व्हिडीओ टाकून परदेशातून पैसे येत असल्याचे आश्वासन दिले जात होते. परंतु ठेवीदारांचा वाढता रोष पाहून पोलिसांनी सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदेकर यांना पुण्यातून ताब्यात घेतले होते.

१ हजार ९७ कोटींच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई

यानंतर बीडच्या जिल्हा कारागृहात असलेल्या सुरेश कुटे यांची ईडीच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या परवानगीने तीन दिवस चौकशी केली होती. ईडीने याआधी ज्ञानराधाच्या विविध शाखांवर छापे टाकले होते. सुरेश कुटे यांनी ठेवीदारांचे पैसे हॉंगकॉंगला नेल्याचे ईडीच्या तपासातून समोर आले होते. आता ईडीकडून ज्ञानराधा मल्टिस्टेट >> पान २






# दसरा उत्सवाला ऐतिहासिक पौराणिक महत्त्व

### चाकावर भोपळा फोडण्याची पद्धत

दसऱ्यानिमित्त शेतकरी वर्ग आपले वाहन असलेल्या बैलगाडीच्या चाकाचे पूजन करून त्यावर भोपळा फोडण्याची पद्धत अनेक भागात आहे. त्याचबरोबर आता घरी असलेले वाहन ट्रॅक्टर, दुचाकी, आदी वाहनांचे पूजन करून त्या वाहनाच्या चाकावर भोपळा फोडण्याची प्रथा ही अनेक भागात आहे. ही प्रथा काही भागात वेगवेगळ्या पद्धतीत असल्याचे सुद्धा दिसून येत आहे.

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा:** अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून दसरा हा सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. दसऱ्याला प्रदेशानुसार विविध रूढी परंपरा आहेत. महाराष्ट्रात दसरा हा सण रावण दहन करण्याबरोबरच शस्त्रपूजन व कृषी संस्कृतीतील शेती उपयोगी साहित्य दळणवळणाचे साहित्य यासह शेतात काम करण्यासाठी लागणाऱ्या अवजारांचेही शमीचे पान वाहून पूजन करून व एकमेकांना आपट्याची पाने सोनं म्हणून देण्याची प्रथा आहे. दसरा या सण उत्सवाला अनेक रूढी परंपरा लाभलेली असली तरी दसरा हा सण एक विजयोत्सव म्हणून साजरा केला जातो. दसरा या सणाला पौराणिक महत्त्व लाभलेला आहे. माता दुर्गादेवीने महिषासुराचा वध करून त्याला पृथ्वीवरून नष्ट केले व पृथ्वीवरील राक्षसी वृत्तीचा नाश केला अशी पौराणिक कथा लाभलेली आहे. त्याचबरोबर प्रभू श्रीराम यांनी रावणाचा वध करून दसऱ्याच्या दिवशी विजय मिळवला. त्यानंतर दसरा हा उत्सव हा सण संपूर्ण देशभर विजयोत्सव म्हणून साजरा केला जातो. प्रभू श्रीरामाने दसऱ्याच्या दिवशी रामाचा वध करून दिवाळीला अयोध्येत प्रवेश केला म्हणून प्रभू श्रीरामाचे विजयाचा हा उत्सव म्हणून साजरा केला .श्रीरामाच्या स्वागतासाठी अयोध्येत प्रकाशोत्सव करण्यात आला अशी आख्यायिका आहे. नंतर या दसरा सणाचे स्वरूप काळानुसार बदलले. अनेक भागात दसरा हा रावण दहन करून साजरा केला जातो. दसऱ्यानिमित्त भव्ययात्रा महोत्सवी भरतो. तर संरक्षण दलाच्यावतीने दसऱ्यानिमित्त शस्त्र पूजन करण्यात येते. त्याचबरोबर जिल्हा पातळीवर तालुका पातळीवर सुद्धा संरक्षण विभागाकडून शस्त्र पूजन करून एक विजयौत्सव साजरा केला जातो. तर देशालाही कृषी परंपरा लाभलेली असल्याने शेतकरी वर्ग हे शेतात वर्षभर लागणाऱ्या शेती अवजाराची विशेष करून त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या लोखंडी साहित्याची पूजा करतात. प्रत्येक शेतकरी वर्ग हा शमीचे पाने, शेतातील ज्वारी, तुर, पऱ्हाटी, अंबाडी आदी शेतातील वनस्पती आणून त्या वनस्पती शेती उपयोगी साहित्यावर वाहून त्यांची पूजा करतात.त्यानंतर वडीलधाऱ्या मंडळींना चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतले जातात. तर मित्र मंडळ लहान थोरांना दसरा निमित्त शुभेच्छा देत हा विजयोत्सव अर्थात दसरा सर्वत्र साजरा केला जातो.दसरा या सणाला येत्या ऐतिहासिक पौराणिक आख्यायिका लाभलेल्या असल्या तरी दसरा या सणातून अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा, वाईटावर चांगल्याचा विजय मिळवणारा दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी अपप्रवृत्तीचे दहन करून केले जाते.




देविदास खनपटे
मुख्य संपादक

## आपट्याची पाने हृदयाच्या आकाराची

शारदीय नवरात्रौत्सव मोठ्या भक्तिभावाने देशभर साजरा होतो. आश्र्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना करून हा उत्सव प्रारंभ होतो. ललिता पंचमी, अष्टमी, महानवमी या दिवसांचे विशेष महत्त्वही आहेच. मात्र, दशमीचा दिवस विजयादशमी म्हणून संपूर्ण भारतात उत्साहात साजरा होतो. या दिवसाला 'दसरा' असेही नामाभिदान आहे. या दिवशी सीमोल्लंघन, सीमांते शमीपूजन, रावणदहन, सोनं लुटण्याची आणि एकमेकांना सोनं म्हणून आपट्याची पाने देण्याची प्रथा आणि परंपरा आहे.साधारणतः त्रेता युगात वरतंतू नावाचे ऋषी होते. त्यांचा मोठा आश्रम तमसा नदीच्या तीरावर होता. या आश्रमात विद्यार्जनासाठी देशोदेशीचे विद्यार्थी येत असतं. त्या काळात राजाचा मुलगा असो की सर्वसामान्य; सर्वजण समान व्यवस्थेत आश्रमात शिक्षण ग्रहण करीत असत. तिथे कुठलाही भेदभाव नसे. शिक्षण पूर्ण झाले की, बारा वर्षांनंतर सर्वजण आपापल्या घरी प्रस्थान करीत असत. जाण्यापूर्वी सर्वांसाठी निरोप समारंभ होत असे; ज्याला शास्त्रात 'समावर्तन समारंभ' म्हणतात. समावर्तन समारंभात गुरू उपदेश झाल्यावर गुरुपूजन आणि यथाशक्ती गुरुदक्षिणा दिली जात असे. राजपुत्र गोदान, भूदान, सुवर्णदान असे विविध दान तर सामान्य शिक्षार्थी त्यांच्या ऐपतीप्रमाणे दान करीत असत. वरतंतू ऋषींच्या आश्रमात त्यांचा एक शिष्य होता. त्याचे नाव कौत्स होते. वरतंतू ऋषींच्या आश्रमात असाच समावर्तन समारंभ सुरू होता. त्या प्रसंगी अनेक शिष्य विविध प्रकारांची गुरुदक्षिणा देत होते. हे पाहत असतानाच शिष्य कौत्सलाही इच्छा उत्पन्न झाली की, आपणही गुरूंना गुरुदक्षिणा दिली पाहिजे. त्याने आपला मनोदय गुरुवर्य ऋष्यश्रेष्ठ वरतंतू यांच्याजवळ व्यक्त केला. गुरूंना कौत्सची आर्थिक स्थिती माहीत होती त्यामुळे त्यांनी कौत्सला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. वाटल्यास तुझे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे आता तू काही वर्षे याच आश्रमात शिक्षक म्हणजे आचार्य म्हणून सेवा दे, अशी सूचनाही त्याला केली. कौत्स मात्र गुरुदक्षिणा देण्यासाठी आग्रही होता. गुरुजींनी काही तरी गुरुदक्षिणा मागावी म्हणून तो हट्ट करू लागला. अनेक वेळा समजावून सांगूनही तो ऐकायला तयार होईना. त्यामुळे गुरुजीदेखील चिडले. वरतंतू ऋषींनी रागावून त्याला चौदा सहस्र सोन्याच्या मोहरा गुरुदक्षिणा म्हणून मागितल्या. अर्थातच इतक्या साऱ्या सोन्याच्या मोहरा कौत्सजवळ नव्हत्याच. पण गुरूला दिलेला शब्द पाळलाच पाहिजे. त्यासाठी काहीतरी व्यवस्था करायलाच हवी, हा विचार सुरू असतानाच त्याच्या सहकारी शिष्याने सुचविले की, शरयू तीरावर अयोध्या क्षेत्रीचे राजे आहेत रघुराजे. रघुराजे दानशूर तर आहेतच; पण ते दिलेले वचन पाळणारे 'प्राण जाय पर वचन न जाय' या तत्त्वाचे आहेत. तिथे जर तू गेलास तर तू रिक्त हस्ताने परत येणार नाहीस. मित्राचा सल्ला ऐकून कौत्स महाशय मजल–दरमजल करीत अयोध्येच्या दिशेने निघाले. काही दिवसातच त्यांना शरयू तीरावरील भव्य अयोध्या नगरी दिसली. त्यांनी शरयूत स्नान केले आणि आन्हिक आटोपून अयोध्या नगरीच्या वेशीजवळ आले. वेशीजवळ त्यांना एक भव्य कुटी दिसली. कुटीभोवती राजसैनिकांचा गराडा दिसला. चौकशी केली असता त्या झोपडीत स्वतः रघुराजे असल्याचे समजले. अजून चौकशी केल्यावर समजले की, रघुराजांनी अतिप्रचंड विष्णुयाग केला. या यज्ञात सर्वस्व दान करण्याची पद्धत असे. त्या आचारानुसार रघुराजांनी आपली सर्व संपत्ती दान करून ते झोपडीत मुनीवेषात राहत आहेत. त्यांचे खानपान ही मृत्तिकापात्रात म्हणजे मातीच्या भांड्यात आहे. शय्यादेखील गवताच्या चटईवर आहे. हे सर्व पाहिल्यावर कौत्स नाराज झाले. म्हणाले, 'इथे हेच झोपडीत राहतात तर माझी व्यवस्था ते कसे करतील ? ' म्हणून खिन्न होऊन परतीला निघणार तोच रघुराजांची दृष्टी त्यांच्यावर पडली. कुणीतरी द्विज आलेला दिसतो म्हणून सैनिकाकरवी कौत्सांना त्यांनी पाचारण केले. कौत्स महाभागांचे आदरातिथ्य करून येण्याचे प्रयोजन विचारले. कौत्स म्हणाले, हे राजन, मला आपल्याकडे काम होते; पण तुझीच अवस्था दिगंबर आहे तर तुला अडचणीत मला टाकायचे नाही. मी माझे काम अन्य ठिकाणी जाऊन करेन. तेव्हा रघुराजे म्हणाले, आम्ही सूर्यवंशी राजे आहोत. आम्ही संपत्तीचे दान केले, पण आमचे बाण, खड्ग शाबूत आहेत. हे कौत्स महोदय, तुम्ही फक्त तुमचा मनोदय सांगा. कौत्सांनी संपूर्ण घटना सांगितली आणि म्हणाले, हे राजा, मला तुझ्याकडून चौदा हजार सुवर्णमुद्रा अपेक्षित आहेत. शक्य असल्यास द्या. माझा आग्रह नाही. रघुराजे ताडकन जागेवरून उठले. त्यांनी धनुष्याला प्रत्यंचा चढविली. भाता पाठीला लावला आणि ते कुटीच्या बाहेर मैदानात आले. त्यांनी शरसंधान केले ते थेट देवेंद्राच्या दिशेने. इंद्रांना आव्हान दिले की, हे देवेंद्र मला सोन्याच्या मोहरा पाहिजेत. त्या ताबडतोब द्या अन्यथा युद्धाला तयार राहा. रघुराजांचा पराक्रम इंद्रराजाला माहीत होता. त्यांनी आपले कोषाध्यक्ष भगवान कुबेरांना सूचित केले की, आपले सुवर्ण भंडार रिक्त करा आणि अयोध्यापती रघुराजांकडे सुवर्णराशी स्वर्गातूनच ओता. देवेंद्राच्या आज्ञेप्रमाणे कुबेरांनी सोन्याच्या राशीच्या राशी ओतण्यास प्रारंभ केला आणि संपूर्ण खजिना रिकामा केला. अयोध्येत सुवर्णाचा पहाड तयार झाला. रघुराजांनी कौत्स यांना सांगितले, हा खजिना तुमचा आहे. तो घेऊन जा आणि वरतंतू ऋषींना देऊन गुरुदक्षिणेचा संकल्प पूर्ण करा. तेव्हा कौत्स म्हणाले, हे राजन! माझा संकल्प चौदा सहस्त्र सुवर्ण मोहरांचा आहे. मी तेवढीच याचना आपल्याकडे केली होती. त्यामुळे मी तितक्याच मोहरा नेणार आहे. उर्वरित मोहरा तुझ्याच अधिकाराच्या आहेत. रघुराजे म्हणाले, अहो महोदय ! या मोहरा मी आपल्यासाठीच घेतल्या आहेत त्यामुळे त्यावर अधिकार तुमचाच. पण कौत्स ऐकेनात. शेवटी असे ठरले की, उरलेले सोने नागरिकांमध्ये वाटून द्यायचे. म्हणून दवंडी दिली की, 'अयोध्येच्या वेशीजवळ सोन्याची लूट ठेवली आहे. सर्वांनी सोने लुटण्यासाठी वेशीजवळ यावे. ' लोकं सीमेवर आलीत. त्यांनी सोने लुटले आणि घरी नेले. दवंडी प्रत्येकाने ऐकली नसल्यामुळे काही जणांना सोने मिळाले नाही. ते त्रेतायुग असल्यामुळे स्वार्थ नव्हताच. ज्यांना सोनं मिळालं नाही त्यांच्या घरी जाऊन ज्यांना सोनं मिळालं ती मंडळी सोनं देऊ लागली. एकमेकांना सोनं देऊन आलिंगन भेट घेऊ लागले. कुबेराने राशी ओतल्या तो दिवस दसऱ्याचा होता. सोन्याच्या राशी आकाशातून ज्या झाडावर पडल्या ते झाड आपट्याचं होतं. त्यामुळे दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून वाटतात. सोने वेशीजवळ पडल्यामुळे लोकांना सोने लुटण्यासाठी सीमेवर जावं लागले. तीच प्रथा आजही दसऱ्याला सोने लुटण्यासाठी गावाच्या सीमेवर सीमोल्लंघनासाठी जातात. त्यावेळी सोने एकमेकांना वाटले होते. खरं सांगू! आपली संस्कृती जीवीच्या जिव्हाळ्यावर आधारित आहे. आपट्याची पाने हृदयाच्या आकाराची आहेत. सोने म्हणून आपट्याची पाने देतो म्हणजे आपलं हृदय, हृदयाचा गर्भितार्थ देतो. भावभावनांचे आदानप्रदान म्हणजे दसरा. अतूट नात्यांचे स्मरण म्हणजे दसरा..

# शासकीय तंत्रनिकेतने अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स संदर्भात सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी** :केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडून नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामध्ये शासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. नवी दिल्ली, रेल भवन येथे आज रेल्वे, सूचना व प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी तंत्र शिक्षण संचालक डॉ विनोद मोहितकर,





महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळचे संचालक, डॉ. प्रमोद नाईक, केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे डॉ. मदन मोहन त्रिपाठी, महासंचालक, एन आय इ एल आय टी (NIELIT), श्री. अभिषेक सिंग, मान्यवर उपस्थित होते. केंद्रीय मंत्री अश्र्विनी वैष्णव म्हणाले, महाराष्ट्र राज्याला औद्योगिक वारसा लाभलेला आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता केंद्र सरकारच्या सहाय्याने हा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पाहिले राज्य आहे. महाराष्ट्रात यशस्वीरीत्या अंमलबजावणी करुन पुढे देशभरात हा उपक्रम राबविण्याचा केंद्र सरकारचा मानस असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मंत्री. चंद्रकांत पाटील म्हणाले, या उपक्रमाचा शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांकरीता सेंटर ऑफ एक्सलन्स ही संकल्पना कार्यान्वित करणे हा मुख्य उद्देश असून या सेंटर मार्फत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाही सुसंगत असल्याचे सांगितले. ईया सामंजस्य कराराच्या अंतर्गत आर्टिफिशिअल इंटेलिजन्स रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज इंडस्ट्री ४.०, ३ डी प्रिंटिंग अँड अलाईड टेक्नॉलॉजी फॉर कपॅसिटी ट्रेनिंग अँड आर अँड डी सेंटर्स (Artificial Intelligence (AI), Robotics, Internet of Things (IoT), Industry 4.0, 3D Printing and Allied Technologies for capacity training and RD centers) या क्षेत्रांमध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये तंत्र शिक्षणाचे बळकटीकरण, ज्ञानाची प्रगती आणि नवकल्पनांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यात येतील. या उपक्रमासाठी लागणारे आर्थिक सहाय्य भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान व इतर शासकीय प्राधिकरणे यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण प्राप्त होऊन उद्योगसमुहांना तांत्रिक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल व रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होतील, याकरीता डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य व डॉ. प्रमोद नाईक, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचे आभार व्यक्त केले.

# चंद्रपुरात आंबेडकरी अनुयायांचा निघाला भव्य महामोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** ११ ऑक्टो. ला समस्त आंबेडकरी समाजाचा महामोर्चा काढण्यात आला, ह्या मोर्चात हजारो आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते, चंद्रपुरातील दिक्षाभूमीची जागा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाला अपुरी पडत असून प्रशासनाने चांदा क्लब मैदान व शासकीय विश्रामगृह हे त्यादिवशी खुले करीत विश्रामगृह येथे बाबासाहेब आंबेडकर यांचं भव्य स्मारक निर्माण करावे अशी मागणी घेऊन आंबेडकर अनुयायांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

१४ ऑक्टो. १९५६ ला नागपूर येथे तर १६ ऑक्टो. १९५६ ला चंद्रपूर येथे लाखों लोकांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म दिक्षा दिली. सध्या स्थितीत




दिक्षाभूमीची जागा १५ व १६ ऑक्टो. च्या धम्मचक्र अनुवर्तन कार्यक्रमासाठी जागा अपुरी पडत असल्याने जागेची कमतरता दूर करण्यासाठी चांदा क्लब ची जागा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी शासकीय विश्राम गृहाची जागा देण्याची मागणी आंबेडकरी समाजाने महामोर्चा द्वारे केली आहे. चांदा क्लब येथील मद्य परवाना व जुगार परवाना रद्द करण्यात यावा अशी मागणी आजच्या महामोर्चा मध्ये करण्यात आली. गांधी चौकातून सुरू झालेला हा मोर्चा शहराचे भ्रमण करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचला, आयोजित मोर्च्यात सहभागी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रवीण खोब्रागडे म्हणाले की दिक्षाभूमीजवळ बनविलेला पूल तोडण्यात यावा, बाबासाहेब आंबेडकर याचं भव्य स्मारकाची निर्मिती करण्यात यावी अन्यथा याहून मोठे आंदोलन आम्ही उभारू असा इशारा दिला.

# कर्नाटकात स्थापना दिनी कन्नड ध्वज फडकावा

## कन्नड भाषा कळाल्याशिवाय कोणीही राज्यात राहू शकत नाही! : डीके शिवकुमार

कर्नाटक : कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी१ नोव्हेंबर रोजी राज्याच्या स्थापना दिनी बेंगळुरूमधील सर्व शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक इमारती आणि कारखान्यांमध्ये कन्नड ध्वज फडकवला जाईल, असे म्हटले आहे. बेंगळुरू शहरी जिल्ह्यात राहणारे सुमारे ५० टक्के लोक इतर राज्यातील आहेत आणि त्यांनी देखील कन्नड शिकण्यास प्राधान्य दिले पाहिजे, असेही ते म्हणाले. सरकारने आयटी आणि तंत्रज्ञान कंपन्यांना ध्वजारोहणाची छायाचित्रे घेऊन बेंगळुरू महानगरपालिकेकडे सादर करणे बंधनकारक केले आहे. कर्नाटक राज्य १ नोव्हेंबर १९५६ रोजी दक्षिण भारतात कन्नड भाषिक भागांचे विलीनीकरण करून स्थापन करण्यात आले, तेव्हापासून दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी स्थापना दिन साजरा केला जातो.

कर्नाटकात राहणाऱ्या व्यक्तीला कन्नड भाषा कळणे आवश्यक

सरकारी आदेशाबाबत शिवकुमार म्हणाले की, म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक करण्याला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. १ नोव्हेंबर हा कन्नडिगांसाठी उत्सवाचा दिवस आहे. मी एक नवीन कार्यक्रम तयार केला आहे ज्या अंतर्गत खढ–इढ क्षेत्रासह सर्व शाळा आणि महाविद्यालये, कारखाने, व्यवसायांमध्ये कन्नड ध्वज अनिवार्यपणे फडकवावा. कन्नड आल्याशिवाय कर्नाटकात राहू शकत नाही, हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे, असेही शिवकुमार म्हणाले.

पान १ वरून...

### ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळा

कंपनीची तब्बल १ हजार कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. सुरेश कुटे यांच्याशी संबंधित मुंबई, संभाजीनगर, बीड, जालना येथील मालमत्तेवर ईडीकडून कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत १ हजार ९७ कोटींच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई झाली आहे.

४२ हून अधिक गुन्ह्यांची नोंद

दरम्यान, सुरेश कुटे यांची ज्ञानराधा मल्टीस्टेट पथसंस्था नोव्हेंबर २०२३ मध्ये अडचणीत आली. या पतसंस्थेवर प्राप्तिकर विभागाच्या छाप्यानंतर तीन लाख ७० हजार ठेवीदार, खातेदारांचे ३७०० कोटी रुपये या पतसंस्थेत अडकले आहेत. या प्रकरणात या पतसंस्थेवर ४२ हून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ५० शाखांचे मागच्या वर्षीचा ऑक्टोबर महिन्यापासून आर्थिक व्यवहार ठप्प असल्याचं सांगितलं जातंय. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातील इंदोर आणि अन्य ठिकाणी ५० शाखा असून साडेसहा लाख खातेदार आहेत.

### जे जे सोडून गेले

कागल विधानसभेतून हसन मुश्रीफ पाच वेळेस निवडून आले आहेत. त्यांच्याविरोधात लढण्यासाठी शरद पवारांनी समरजीत घाटगेंना भाजपमधून आयात केलं आहे. घाटगे यांनी यापूर्वी मुश्रीफ यांच्या विरोधात निवडणूक लढवली आहे. परंतु मतांच्या विभाजनामुळे त्यांचा पराभव झाला होता. यावेळची निवडणूक विकासाची होणार असून, कागलमध्ये परिवर्तन होईल, असा मला विश्वास आहे, असा विश्वास समरजीत घाटगेंनी व्यक्त केलाय. इंदापूरमध्ये पवारांनी भाजपचे माजी नेते हर्षवर्धन पाटील यांना भरणे यांच्याविरोधात उमेदवारी देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या दत्तात्रय भरणे यांनी केवळ ३ हजार मतांनी हर्षवर्धन पाटलांचा पराभव केला होता. त्यातच लोकसभा निवडणुकीत इंदापुरातून सुप्रिया सुळेंना मोठा लीड मिळाल्याने हर्षवर्धन पाटलांना आत्मविश्वासही वाढला आहे. पवार साहेबांच्या पाठिंब्याने आम्ही अर्धी लढाई आधीच जिंकली असून, आगामी निवडणुकीत आमचा विजय होईल, असा मला विश्वास आहे, असं हर्षवर्धन पाटील म्हणाले आहेत. गडचिरोलीच्या अहेरी मतदारसंघात मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांची कन्या भाग्यश्री आत्राम यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलाय. आत्राम यांच्याविरोधात त्यांच्यात कन्येला उभा करण्याचा शरद पवारांचा डाव आहे.

मंचरचे आमदार असलेल्या दिलीप वळसे पाटील यांनाही लक्ष्य करण्याची पवारांची रणनीती आहे. यापूर्वी वळसे पाटील यांच्या विरोधात निवडणूक लढविलेल्या देवदत्त निकम यांच्या मागे थोरल्या पवारांनी आपली ताकद लावली आहे. मागील निवडणुकीनंतर नाराज झालेल्या काही लोकांनी देवदत्ता निकम यांना पाठिंबा देण्यास सुरुवात केली आहे.

शरद पवारांनी नाशिकच्या येवल्यात मंत्री छगन भुजबळ यांच्या विरोधात उमेदवार निश्चित केला नसला तरी त्यांनी तिथून लोकसभेच्या प्रचाराला सुरुवात केली होती. नुकत्याच त्यांनी काही स्थानिक नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन येवल्यात ताकद वाढवण्याचा प्रयत्न केलाय. आमचा पक्ष येवला जिंकण्यासाठी कटीबद्ध आहे.

# महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी NEEDLY SOS ॲप ची सुरुवात मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची संकल्पना

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : राज्यात महिला अत्याचाराचे प्रमाण वाढत असताना पुण्यातील आयटी तज्ञ यांच्या वतीने महिला, मुली, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पुरुष आणि मुलांसाठी NEEDLY SOS ॲप ची सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत ११ ऑक्टोबर रोजी भाजपतर्फे डॉ.मंगेश गुलवाडे व प्राचार्य मुरलीधर भुतडा यांनी सदर ॲप बाबत माहिती दिली.

मात्र प्ले स्टोर वरून ॲप साठी शुल्क मोजावे लागणार आहे




पण पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांसाठी ही ॲप मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र त्यासाठी नागरिकांना ९१६८७२५१२५ या मोबाईल क्रमांकावर मिस कॉल करावा लागणार त्यानंतर सदर ॲप ची लिंक मोबाइल मध्ये येणार असून त्यानंतर ती ॲप मोबाईल मध्ये डाऊनलोड करावी लागणार.महिला व मुलींची सुरक्षेसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून उपलब्ध करण्यात आली आहे, याबाबत प्राचार्य भुतडा म्हणाले की सदर निडली ॲप चा शुभारंभ चंद्रपूर जिल्ह्यातून करण्यात येत आहे, येणाऱ्या निवडणुकीत ही बाब एक एजेंडा म्हणून समाविष्ट करण्यात येणार आहे.

महिला व मुली संकटात सापडल्या तर त्यांना मोबाईल मधून आपण ॲप द्वारे समाविष्ट केलेल्या ४ मोबाईल क्रमांकावर लोकेशन पाठविण्यात येईल, आपत्कालीन संदेश, अज्ञात व्यक्तीचा फोटो, विशेष म्हणजे सदर ॲप मध्ये राज्यातील सर्व पोलीस स्टेशनचे क्रमांक सुद्धा समाविष्ट केले आहे अशी माहिती भुतडा यांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### विजयादशमी निमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन; स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची परंपरा



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर / प्रतिनिधी :** विजयादशमी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख सहा उत्सवांपैकी महत्त्वाचा उत्सव कारण याच दिवशी ९९ वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. हा स्थापना दिवस संघ पथसंचालना द्वारे शक्ती प्रदर्शनाने साजरा करत आला आहे. यामध्ये बालांपासून प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने भाग घेतात. या पथसंचलनाचे वैशिष्ट्य म्हणजे यात घोषवादन केले जाते. तसेच एका स्वयंसेवकाच्या हातामध्ये अग्रस्थानी भगवा ध्वज धारण केलेला असतो. तसेच याच दिवशी हिंदू परंपरेनुसार शस्त्र पूजनही केले जाते. संघाचा उद्देश हिंदू समाजाला संघटित करण्याचा असल्याने पथसंलनाच्या निमित्ताने या संघटितपणाचे दर्शन होते.

पंढरपूर मध्ये याच अनुषंगाने स्वतंत्र्यपूर्व काळापासून पथसंचलन काढत असते. ही परंपरा यावर्षीही सुरू ठेवली आहे. पंढरपूर परिसरातील अनेक गावातून मोठ्या संख्येने स्वयंसेवक या पथसंचलनात सहभागी होतात. यावर्षी हे संचलन टिळक स्मारक मैदानातून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक, चौफळा, पश्रि्चमद्वार, महाद्वार, पासून प्रदक्षिणा मार्गाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकामधून पुन्हा टिळक स्मारक मैदान येथे येते. यावेळी मोठ्या संख्येने त्या परिसरातील नागरिक या पथसंचलनाचे स्वागत फुले उधळून, सडा रांगोळी करून करीत असतात. येणाऱ्या शताब्दी वर्षामध्ये संघाचा गावा गावांमध्ये पोहोचण्याचा उद्देश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आहे अशी माहिती माननीय संघचालक सुधाकर जोशी यांनी दिली. यावेळी तालुका कार्यवाह योगेश माने व सह कार्यवाह परमेश्र्वर जमदाडे उपस्थित होते.

### दुर्गाष्ठमी दिनी आई तुळजाभवानीची महिषासुराचा वध करतानाची महिषासुर मर्दिनी अलंकार महापुजा



दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव / प्रतिनिधी :** शारदीय नवरात्र महोत्सवात आज शुक्रवारी ११ ऑक्टोबर रोजी दुर्गाष्टमीच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीजींची महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली. श्री तुळजाभवानी देवीजींच्या नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर आज महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली. ज्यावेळी महिषासुराने देवतांना हाकलून दिले व स्वत:स्वर्गाचा आनंद भोगू लागला, त्यावेळी साक्षात पार्वती अवतार असलेल्या श्री तुळजाभवानी माता सर्व देवांच्या तेजापासून उत्पन्न झालेली जगदंबा माता भवानी आहे. हिने सर्व दैत्यांचा राजा महिषासुराचा वध केला व सर्व देवतांना स्वर्ग प्राप्तीचा आनंद दिला.त्यामुळे देवीला महाअलंकार घालण्यात येऊन महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येते.अशी आख्यायिका सांगितली जाते.

### दसऱ्यानिमित्ताने फुलं आणि आपट्याच्या पानांनी बाजार बहरला

**नवी मुंबई / प्रतिनिधी :** दसऱ्या निमित्ताने रालि मार्केटमध्ये झेंडूच्या फुलांची व आपट्याच्या पानांची मोठ्या प्रमाणात आवक झाली असून फुलं घेण्यासाठी नागरिकांची लगबग सुरु असल्याचे दिसतं आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी झेंडूच्या फुलाचा भाव वाढला असून १५० ते १६० रुपयानी वाढ झाल्याचे झेंडू विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी सांगितले. परतीचा पाऊस जास्त प्रमाणात पडल्यामुळे फुलांची आवक कमी प्रमाणात झाली असून फुलांचं नुकसान झालंयआणि त्यामुळेच दर वाढले आहेत असं व्यापऱ्यांनी सांगितले.



# शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून चांदवडच्या रेणुका माता मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी ११ लाखाचा निधी जाहीर

## ■ चांदवड येथे शिवसेना महिला आघाडीचा मेळावा उत्साहात संपन्न
## ■ डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले चांदवडच्या रेणुका मातेचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**नाशिक : नवरात्र उत्सवानिमित्ताने विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी चांदवड येथील श्री रेणुका माता देवीचे दर्शन घेऊन देवीची विधिवत पूजा करत देवीला महावस्त्र, नैवेद्य, पुष्पहार अर्पण केला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या शिवसेना आघाडीच्या महिला मेळाव्यामध्ये रेणुका देवी माता देवस्थान परिसराच्या सुशोभीकरणासाठी अकरा लाख रुपयेचा निधी शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी जाहीर केला.**

शिवसेना महिला आघाडीच्या मेळाव्यात बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पक्षश्रेष्ठ तिकीट देताना जो निर्णय घेतील त्याच्या पाठीमागे उभे राहून भरघोस मतांनी महायुतीच्या उमेदवाराला विजयी करावे. जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब चौधरी यांचे काम अतिशय सुंदर आणि नियोजनबद्ध असल्याचे सांगत त्यांनी चौधरी यांच्या कामाचे कौतुक केले. भाऊसाहेब चौधरी यांना उमेदवारी मिळाल्यास येथील जनता त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी राहील असा विश्र्वास डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिवस-रात्र जनतेचा सेवा करत आहेत. यामध्ये त्यांनी समाजातील सर्व क्षेत्रांचा विचार करून त्याकरता विविध महामंडळांची स्थापना केलेली आहे. नुकततेच पत्रकारांसाठी देखील महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. यातून पत्रकारांना वैद्यकीय उपचारासह विविध लाभ मिळणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

यावेळी भाऊ चौधरी सचिव शिवसेना, श्यामल दीक्षित जिल्हा समन्वयक, रोशनी कुंभार्डे चांदवड जिल्हा प्रमुख, मंगलाताई भास्कर जिल्हा प्रमुख दिंडोरी, अस्मिता देशमाने महानगर प्रमुख, श्रद्धा जोशी ग्रामीण जिल्हा प्रमुख, पूजा धुमाळ इगतपुरी जिल्हा प्रमुख यांसह मोठ्या संख्येने महिला शिवसैनिक उपस्थित होत्या.



# चोपड्यात आमदार लता सोनवणे यांच्या हस्ते आनंदाच्या शिधा वाटप

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव / प्रतिनिधी :** राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या घरी सण उत्सवाच्या काळात गोड धोड पदार्थ बनवून सण साजरे करता यावे यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांनी आनंदाचा शिधा लाभार्थी कुटुंबांना शंभर रुपयात मिळावा या संकल्पनेने आनंदाचा शिधा वाटप सुरू केले आहे. आज चोपडा शहर व तालुक्यातील लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा सण उत्सवाच्या निमित्ताने आमदार लता सोनवणे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात काही लाभार्थ्यांना आनंदाच्या शिधा वाटप करून शुभारंभ करण्यात आला. तालुक्यातील ४२ हजार ७७० लाभार्थ्यांना आनंदाच्या शिधा वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या वेळी माजी आमदार चंद्रकांत सोनवणे, तहसीलदार भाऊसाहेब



थोरात, मंगला पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पाटील, विकास पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नितेश राणेंना महाराष्ट्र पोलिसांची अजून चांगली ओळख नाही; अंबादास दानवे यांची नितेश राणेवर टिका



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी :** .महाराष्ट्र पोलिसांनी भली भली कारवाई केली आहे. कसाब सारखा अतिरेकी महाराष्ट्र पोलिसांनी अडवला. नितेश राणेंना महाराष्ट्र पोलिसांची अजून चांगली ओळख नाही. महाराष्ट्र पोलीस ताकदीचे आहे.फक्त यांच्या हातात सरकार असल्यामुळे शांत बसले आहे. पोलिसांना मोकळे सोडा हे सगळ्यांना नीट करतील. अशी टिका विरोधी पक्ष नेते अंबादास धावणे यांनी करत नारायण राणेचा समाचार घेतला.

यावेळी त्यांनी प्रसार माध्यमातून बोलताना अनेक मुद्द्यांना हात घालत सरकारवर टीका केली. यावेळी ते म्हणाले की, अजित पवार नाराज असून ते करणार काय हा प्रश्र्न आहे? महाराष्ट्राची आर्थिक शिस्त पूर्णपणे बिघडली आहे. महाराष्ट्र कर्जबाजारी झाला आहे. रोज नवीन नवीन योजना आणि मंडळ जाहीर होत आहे. यांना देण्यासाठी एक रुपया देखील तिजोरीत नाही. अजित पवार यांच्या सारखा कडवट आर्थिक शिस्तीचा भोगता असलेला नेता निश्रि्चत या सर्व विषयावर चिडू शकतो. म्हणून तो राग अजित पवारांनी व्यक्त केला असावा. आज पत्रकार परिषद घेऊन ते बाहेर पडतील असं वाटत नाही एवढा दम त्यांच्यात नाही. तर दसरा मेळाव्याची तयारी जोरात आहे. विराट असा दसरा मेळावा उद्या होईल, एक झेंडा एक पक्ष एक मैदान आजही शिवसेनेचे चालू आहे. उद्धव ठाकरे उद्या विचारांचा सोनं देतील असे ही दानवे म्हणाले. तसेच असे मिळावे दरवर्षी होत असतात. आता नारायण गडावर आणि भगवानगडावर ही मिळावे होत आहे. संख्या कमी जास्त असेल पण दोन्ही ठिकाणी मेळावे होत आलेले आहेत. दोन्ही ठिकाणी विचार व्यक्त होतील. नारायण गडाच्या माध्यमातून मराठा समाजाची एकत्र शक्ती येत आहे. मराठा समाज एकत्र होत आहे आणि मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात याकडे महाराष्ट्र आणि मराठा समाजाचे लक्ष आहे. केंद्रीय मागास आयोग १८ जातींना आरक्षण स्वागत आहे. याच्यातून रिझर्वेशन होणार आहे. मी येणार आहे याचा विचार होणे गरजेचे आहे. माझ्या दोघांनाही विरोध करत होते त्यांनाही आणि ज्यांनी दिले त्यांनाही यातून लाभ होणार आहे का? नाना पटोले मुख्यमंत्री झाले तर स्वागत आहे.माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत. काही अडचण नाही. तर परभणी येथील अत्याचार घटनेबाबत मत व्यक्त करताना धावणे यांनी सरकारवर टीका करत या सरकारच्या काळात गुन्हेगार लोकांना पूर्णपणे संरक्षण मिळत आहे. बदलापूर गटनेते देखील संस्थाचालकांना संरक्षण दिले. परभणीचे आरोपी अजून अटक नाही. बोटचेपीपना विषयांमध्ये सरकारचा पापीपणा आणि अक्षम्य दुर्लक्ष पणा कारणीभूत आहे.

# महिलांवरील अत्याचारात होत असलेली वाढ चिंतनीय साजेदा बेगम

## जमात ए इस्लामी हिंद चा नैतिकतेवर कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड / प्रतिनिधी :** शिक्षण देत असताना मुलींसोबत मुलांवर संस्कार करणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या युगात मोबाईल टीव्ही यामुळे अश्र्लीलता खूपच वाढलेली आहे.स्वतंत्रतेच्या नावाखाली मुले मुली हे अत्यंत उद्धटपणे वागत असल्याचे असल्याचे दिसून येत आहे.

महिलांवरील अत्याचार खूपच वाढत आहे दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचारां मध्ये होत असलेली वाढ ही अत्यंत चिंतनीय बाब आहे. आपली मुले कोठे जात आहेत काय करत आहेत यावर लक्ष घालने अत्यंत गरजेचे झाले आहे. असे प्रतिपादन साजेदा बेगम सचिव महिला विंग जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र यांनी केले. त्या रिसोड येथील डॉक्टर अल्लामा इकबाल उर्दू हायस्कूल येथे महिलांसाठी आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.दि.८ आक्टोबर रोजी जमात-ए-



इस्लामी हिंद महिला विंगच्या वतीने नैतिकतेवर आधारीत स्वातंत्र्याच्या नैतिक गुणांची हमी म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,

पुढे बोलताना साजेदा यानी समाजात विविध वाईट गोष्टी, घरगुती हिंसाचार, घरगुती भांडणे, अयोग्य संबंध आणि प्रकरणे, नग्नता आणि अश्र्लीलतेचे वातावरण, व्यभिचार आणि फॅशनच्या नावाखाली महिलांशी व्यभिचार आदी विषयावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमात जमात-ए-इस्लामी हिंद जिल्हा वाशीम अध्यक्ष डॉ.निखत उरूज, रिसोड अध्यक्ष नाहिद बेगम विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात कुराण पठणाने सुबिया हिने केली. जमात-ए-इस्लामी हिंद चा परिचय, जीआयओचा परिचय, आफिरा फातिमा यांनी सादर केला. कार्यक्रमात नाहिद साहिबा, डॉ. निखत व लहान मुलांनी मांडलेल्या संदेशातून समाजात पसरत असलेले गैरवर्तन, मोबाईल फोनचा अयोग्य वापर आणि अनैतिकता यावर प्रकाश टाकण्यात आला व महिलांना आपल्या जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.मुलांच्या संगोपनाच्या समस्या, घटस्फोट, बलात्कार, या सर्व गोष्टींबाबत साजेदा बेगम यानी यांनी मत मांडले कार्यक्रमाचे संचालन अजरा जमाल तर आभार प्रदर्शन आफरीन बेगम यांनी केले.

# बोपदेव घाटातील घटना उघडकीस आणण्यात पोलिसांना यश

दैनिक आपला विदर्भ

**पुणे / प्रतिनिधी :** सात दिवसापूर्वी बोपदेव घाटात घडलेल्या घटने प्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.गुन्हे शाखा पोलिस असे तब्बल ७०० पोलिस कर्मचारी अधिकारी या घटनेतील आरोपीचा शोध घेत होते. अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दि.१० ऑक्टोबर रोजी प्रसार माध्यमांना दिली.

एवढी अधिक माहिती देताना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, बोपदेव घाटातील घटना घडून सात दिवस झाले होते तरी आरोपीचा सुगावा लागत नव्हता. या आरोपीचा शोध घेण्यासाठी तब्बल ७०० पोलीस कर्मचारी तपास करीत होते. सीसीटिव्ही आणि इतर टेक्निकल बाबीवरून आरोपी ताब्यात घेतले आहेत. इतर दोन आरोपी पण लवकरच ताब्यात येतील,अशा प्रकारच्या घटना घडू नये, म्हणून आम्ही काम करत आहोत. या गुन्ह्यात तीनच आरोपी आहेत.आरोपी चकवा देत होते, सीसीटिव्ही असेल त्या ठिकाणच्या रस्त्यावर येत नव्हते.एआय,स्केच सीसीटिव्ही याचा फायदा झाला.आरोपीवर पुण्याबाहेर गुन्हे दाखल आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी ड्रोनचा पण वापर करण्यात आला. त्याचा पण फायदा झाला. दि.१० ऑक्टोबर रोजी दुपार नंतर काही चांगले सीसीटीव्ही मिळाले त्यानंतर व्यक्ती तपास करण्यात आला आणि आरोपी असण्याची शक्यता आहे,अस कळाले.आरोपी जागा बदलून राहत होते.त्यातून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. तीन ही आरोपी परराज्यातील आहेत की नाही याबद्दल तपास केल्यावर कळेल.या गुन्ह्यात काल दुपारपर्यंत ७०० च्या वर सीसीटिव्ही तपासले. हजारो रेकॉर्ड वरील गुन्हेगार याचा तपास झाला. अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी प्रसार माध्यमांना दिली.



## विविध वृत्त...

### लोकसभेत मुस्लिमांनी मत जिहाद केले, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे मोठे विधान



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आगामी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मुस्लिम समाजाच्या मते आपल्याकडे खेचण्यासाठी शिंदे, फडणवीस सरकार विविध योजना काढत असतानाच शिंदे गटाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मुस्लिम मताबाबत एक मोठे विधान केले आहे. लोकसभेत मुस्लिमांनी मत जिहाद केले असल्याचे म्हटले आहे. वंचित बहुजन आघाडी ने आगामी विधानसभेसाठी १० मुस्लिमांना उमेदवारी दिली असून एडवोकेट बाळासाहेब आंबेडकरांनी मुस्लिम कार्ड फेकले आहे का या विचारलेल्या प्रश्नावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी हे मोठे विधान केले.ते म्हणाले मुस्लिम कार्ड महाविकास आघाडीने आतापर्यंत फेकलेला आहे. आणि मुस्लिमांनी ते कार्ड स्वीकारल्याचे लोकसभेच्या निवडणुकीत आम्ही अनुभव घेतला. मुस्लिमांनी सुद्धा मत जेहाद करून महाविकास आघाडीला मतदान केलेल आहे. त्यामुळे मुस्लिम कार्ड कोणता पक्ष फेकतो.त्याच्याशी आमचा काही संबंध नाही आम्ही कट्टर हिंदुत्ववादी विचारसरणीचे शिवसेना आणि भाजप आहे. अशी प्रतिक्रिया केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे.. ते आज बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे आमदार श्वेता महाले यांच्या संकल्पनेतून १५ अब्ज ४८ कोटी विविध कामांचा लोकार्पण सोहळ्यासाठी आले होते..

### वातावरण बदलामुळे शहरात वाढले व्हायरलचे रुग्ण घराघरात सर्दी तापचे रुग्ण रुग्णालयात गर्दी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :**पावसाळा संपत आला असून आता हिवाळ्याची चाहूल लागण्यास सुरुवात झाली आहे. दरम्यान ऑक्टोबर मध्ये उष्ण वातावरण असल्याने रुग्ण शहरात वाढले आहेत त्यात सण समारंभामुळे व्हायरल पसरण्याचा वेग वाढत असून घराघरात सर्दी खोकला तापाचे रुग्ण आढळून येत आहेत. शहरात रोज १०० किंवा २०० हून अधिक रुग्ण ताप सर्दी खोकल्याची तक्रार घेऊन रुग्णालयात दाखल होत आहे गेल्या आठ दिवसापासून परतीचा पाऊस कोसळत आहेत यामुळे उष्णतेचे प्रमाण अचानकपणे वाढले आहे त्यामुळे गर्मी जाणवत असून पाऊत कोसळत असल्याने वातावरणात बदल झाला आहे. व्हायरलच्या रुग्णांनी मनपाच्या आरोग्य केंद्र किंवा खाजगी डॉक्टरांकडे गर्दी करत असल्याचे दिसत येत असून मनपा आरोग्य केंद्रात किंवा खाजगी डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावे असे आवाहन मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पारस मंडलेच्या यांनी केले आहे.

### भरत गोगावले हे काय बोलून गेले? चुतीया बनविणारी बहीण पाहिजे, या विधानावर उठला वादंग



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि एसटी महामंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष भरत गोगावले यांनी केलेले विधान यामुळे त्यांच्यावर समाज माध्यमांवर टीकेची झोड उठताना दिसत आहे महाड मधील एका कार्यक्रमात भरत गोगावले यांची जीभ घसरुन त्यांनी थेट लाडक्या बहिणीच्या विधानावरून एक चुकीचं वक्तव्य केलं आहे . माजी आमदार माणिकराव जगताप यांची कन्या स्नेहल जगताप विधानसभा निवडणूक लढवीत आहेत, त्यांचं नाव न घेता गोगावले यांनी हे विधान केलेय.काम करणारं भाऊ पाहिजे की बनविणारी बहीण पाहिजे. अस वक्तव्य करत भरत गोगावले यांनी कार्यकर्त्यांना उपदेशनकेलंआहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोणासोबत अलायन्स करायचं, दोन दिवसांनी निर्णय होईल- तुपकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाविकास आघाडीच्या नेत्यांनी चर्चेच निमंत्रण दिलं होतं त्या अनुषंगाने त्यांच्या चर्चेच्या निमंत्रणावरून आम्ही तिथे गेलो होतो. त्यांच्याशी काही गोष्टींवरून चर्चा झाली. सोयाबीन कापसाच्या प्रश्नावर चर्चा झाली. कुठे कुठे आम्ही जागा लढतोय या संदर्भात सगळ्या गोष्टी त्यांनी जाणून घेतल्या. आणि ठोस असं आमच्यात काही झालं नाही त्यामुळे त्यावर बोलणं उचित ठरणार नाही.. दोन दिवसांनी कोर कमिटीची मीटिंग कोर कमिटीच्या मिटिंग मध्ये ठरवू २४ जागा लढायच्या की शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोणासोबत अलायन्स करायचं दोन दिवसांनी निर्णय होईल..

या देशामध्ये बाबासाहेबांनी प्रत्येकाला संविधानाने लढण्याचा अधिकार दिलेला आहे.. अमुक लढले म्हणजे यांचा नुकसान होतं आणि प्रमुख लढले म्हणजे यांचं नुकसान होतं.. तिकडे सांगलीमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे डिपॉझिट जप्त झालं होतं तिथे अपक्ष उमेदवार निवडून आले विशाल पाटील.. अरविंद केजरीवाल यांनी नव्याने पक्ष काढला आणि सर्व प्रस्थापितांना झोपवून तीनदा दिल्लीमध्ये सरकार आणलं ..९५ साली अपक्षांनी सरकार बसवलं.. मागच्या विधानसभेत अनेक अपक्ष ही निवडून आलेत.. असं काही म्हणता येत नाही की पक्षानेच माणूस निवडून येऊ शकतो अपक्षाने नाही.. प्रत्येकाला निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा संविधानाने अधिकार दिलेला आहे.. यांनीच उतरावे त्यांनी उतरू नये.. या समाजाच्या माणसाने उतरावे या समाजाच्या माणसाने उतरू नये.. असं म्हणणं चुकीचं आहे..

निवडणुका लागायला वेळ आहे आचारसंहिता लागली नाही .. आता आमच्या दृष्टीने शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून देणे सोयाबीनच्या भावाचा प्रश्न कर्जमुक्तीचा प्रश्न कापसाचा प्रश्न आहे असे अनेक प्रश्न घेऊन आम्ही लढतोय जेव्हा निवडणुका लागतील तेव्हा निवडणुकीवर बोलू..



छावा संघटनेचे घाडगे पाटील आणि मी लातूरमध्ये एकत्रित होतो.. छावाचे पदाधिकारी आणि आमचे काही पदाधिकारी एकत्रित एक बैठक झाली.. सोयाबीन कापसाचे पीक विम्याचे जे काही शेतकऱ्यांचे आंदोलन आहे एकत्रित करण्याचा निर्णय झाला.. तुकड्या तुकड्यात आंदोलन करायचं नाही.. सगळ्यांनी एकत्र येऊन एकमुखाने आंदोलन करायचं.. जर प्रस्तावित वृक्ष वेगवेगळ्या विचारधारा बाजूला ठेवून सत्तेसाठी एकत्र येत असतील तर चळवळ मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करण्यासाठी एकत्र येत असतील तर बिघडलं कुठे.. या भावनेने आम्ही एकत्र येतोय जेणेकरून सरकारला गुडघे टिकवायला भाग पाडू..

बाळासाहेबांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे.. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आहेत त्यांच्या विचारांचे वारस आहे.. जेव्हा जेव्हा आमच्यावर अडीअडचणीचा संकटाचा काळ येतो तेव्हा बाळासाहेब आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात..

तो त्यांच्या पक्षाचा अधिकार आहे कोणाला उमेदवारी द्यायची कोणाला नाही द्यायची.. सोशल इंजिनिअरिंग करून उमेदवारी वाटप करण्याचा सगळ्या समाज घटकांना सोबत घेण्याचा .. त्यांनी कोणाला उमेदवारी द्यायची कोणाला नाही द्यायची हे मी बोलणं उचित ठरणार नाही ..

## समृद्धी महामार्गावर खासगी बसवर दगडफेक करणारे आरोपी अटक; दगडफेक मध्ये २ जण झाले होते जखमी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलडाणा :** समृद्धी महामार्गा वरुन दिग्रस ते मुंबई कडे जाणाऱ्या खासगी बसवर अज्ञात आरोपींनी दगडफेक केल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी रात्री घडली होती .यामध्ये खासगी बसच्या चालकासह २ जण जखमी झाले होते. याप्रकरणी बीबी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. ही घटना देऊळगाव कोळ ते बीबीकडे जाणाऱ्या ओव्हर ब्रिज पुलावरून समृद्धी महामार्गाने मुंबईकडे जाणारी खासगी बस वर अज्ञात आरोपींनी दगडफेक केली. त्यामुळे खासगी बसची समोरील काच





फुटून चालक आणि दोन प्रवासी जखमी झाले होते. पोलिसांनी तपासात आरोपी रामनारायण दिगंबर चव्हाण याला ताब्यात घेऊन पूर्व व मनस्त्यातून व व्यवसायात झालेल्या आर्थिक नुकसानीतून गुन्हा केल्याची कबुली दिली आहे..शुभम आटोळे जावेद शेख रवी शिरसाठ या चौघांना पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास करत आहे.

## सोयाबीन मातीमोल विकत असल्यामुळे शेतकरी मेटाकुटीला

रिसोड बाजार समितीमध्ये मिळत आहे ३५०० ते ४००० हजाराचा दर



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** सोयाबीनला भाव मिळत नसल्यामुळे सोयाबीन विकून उत्पादन खर्चही निघत नसल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे यावर्षी उत्पन्नातही घट आली आहे येथील बाजार समितीमध्ये सोयाबीनला ३५०० ते ४००० रुपये दर मिळत आहे हमीभावा पेक्षा १००० ते १४०० दर कमी मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

सोयाबीन हंगाम सुरू असून अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या हाती सोयाबीन आले आहे यावर्षी उत्पन्नामध्ये कमालीची घट आली असून एकरी चार ते पाच क्विंटलपर्यंत उत्पन्न होत आहे उत्पन्न व सोयाबीन हाती येई पर्यंतचा खर्च याची गोळा बेरीज केली असता सोयाबीन ची शेती आतबट्ट्याची ठरत आहे शेतमाल वगळता महागाईने कळस गाठला आहे शेतीला लागणाऱ्या निविष्ठा व इतर वस्तू यांचे भाव गगनाला भिडले आहेत शेतमाल मात्र मातीमोल भावाने विकला जात आहे मागील तीन–चार दशकापासून सोयाबीन हे शेतकऱ्याचे मुख्य पीक झाले आहे परंतु मागील वर्षभरापासून सोयाबीनचे भाव हे चार हजारावर स्थिरावल्या मुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणी सापडला आहे बाजारपेठेत सोयाबीनचा किमान दर चार हजाराच्या आत पोहोचला आहे सोयाबीन हे मुख्य पीक असल्यामुळे शेतकऱ्यांना सोयाबीन विकण्या शिवाय दुसरा पर्याय नाही रब्बीच्या पेरणीची तजवीज करण्याकरिता नाईलाजाने सोयाबीन मातीमोल विकावे लागत आहे

शासनाने सोयाबीनचा हमीभाव ४८९२ रुपये जाहीर केला असला तरी हमी भावापेक्षा तब्बल १००० ते १४०० दर कमी मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे गेल्या वर्षभरापासून सोयाबीनचे भाव हे चार हजाराच्या दरम्यान स्थिरावले आहे त येथील बाजार समितीमध्ये ११ ऑक्टोंबर रोजी सोयाबीनला तीन हजार पाचशे ते चार हजार रुपये पर्यंत दर मिळाला आहे सोयाबीन विकून झालेला खर्चही वसूल होत नसल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे तसेच यावर्षी सोयाबीनच्या उत्पन्ना मध्ये ही कमालीची घट आली आहे हमीभावाच्या तुलनेत क्विंटल मागे एक हजाराच्या वर नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतोष निर्माण होत आहे शासनाने हमी भावाने सोयाबीनची खरेदी करावी अशी मागणी शेतकरी वर्गामधून केल्या जात आहे.

## सोशल मीडियावर पोलीस प्रशासनाचा वॉच

ग्रुप ॲडमिन सर सदस्यांनी दक्षता बाळगण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** सोशल मीडियाच्या माध्यमातून सामाजिक तेढ निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने सोशल मीडियावर सण उत्सव व निवडणुकीच्या प्रारंभी सोशल मीडियावर वॉच ठेवणे सुरू केले असून सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा देत सोशल मीडिया चा नागरिकांनी उपयोग चांगल्या कामासाठी करावा यातून कोणत्याही प्रकारची सामाजिक तेढ अथवा बदनामी करू नये असे आवाहन अकोला येथील खदान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.



त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, कलम १६८ बी.एन.एस.एस.प्रमाणे पोलीस पोलीस प्रशासनाला विशेष अधिकार आहेत. खदान पोलीस स्टेशन परिसरात नवदुर्गा उत्सव, धम्मचक्र प्रवर्तन व विधानसभा निवडणूक होणार असून या दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सण उत्सव व विधानसभा निवडणूक शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडावी, सोशल मिडीया व्हाट्सअप, फेसबुक इंस्टाग्राम इत्यादी माध्यमातून आक्षेपार्ह मॅसेज, व्हीडीओ टाकणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाच्या वतीने लक्ष ठेवण्यात येत आहे. समाज कटंकाकडून सोशल मिडीयाचे माध्यमातून चुकीचे मॅसेज व अफवा पसरविल्या जातात व त्यातून दोन समाजात तेढ निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीसांचा सोशल मिडीयावर लक्ष ठेवण्यात येत असून अफवा पसरविणाऱ्यांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तरी आक्षेपार्ह मॅसेज प्रसारीत करू नये. पोलीस स्टेशन परिसरात उत्सव प्रसंगी दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे उद्देशाने आक्षेपार्ह मॅसेज,फोटो, खोट्या बातम्या प्रसारीत करून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेत बाधा निर्माण करणाऱ्या समाज कंटकाविरूध्द पोलीस प्रशासनाचे वतीने कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.आगामी काळात कायदा व सुव्यवस्थेत अबाधीत राहण्याचे दृष्टीकोनातून आपण आपले व्हाट्सअप ग्रुपला सेटींग करून आपले ग्रुपवरून कोणत्याही अफवा किंवा दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशा प्रकारचा मजकूर प्रसारीत होणार नाही याची ग्रुप एडमिन व ग्रुप सदस्य या नात्याने खबरदारी घ्यावी. असे आवाहन अकोला येथील कदम पोलीस स्टेशनचे निरीक्षक यांनी केले आहे.

## मेहकर शहरात ९८० कोटींची विकासकामे केली – आ. संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर, शहराच्या विविध भागातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन त्या त्या भागांमध्ये बहुविध प्रकारची ९८० कोटी रुपयांची विकास कामे गतकाळात करण्यात आली असून विकासाचा हा झंजावात पुढेही सुरूच ठेवण्यात येईल, असे विचार आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केले.

मेहकर नगरपालिकेच्या वतीने आयोजित ६८ कोटी रुपयांच्या विविध ३२ कामांचे आज आभासी पद्धतीने भूमिपूजन आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज झाले. यानिमित्ताने




पालिकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष सुरेशतात्या वाळूकर, माजी नगराध्यक्ष रामराव म्हस्के, युवासेनेचे तालुकाध्यक्ष भूषण घोडे, महिला आघाडीच्या कविताताई दांदडे, वैशालीताई सावजी, अक्काताई गायकवाड ,अभियंता अजय मापारी, नितीन राऊत, हनीफ गवळी, श्रीमती फंगाळ प्रामुख्याने उपस्थित होते.मुख्याधिकारी रामराजे कापरे , विविध विभागांचे कर्मचारी अजय चैताणे ,संजय गिरी ,सुधीर सारोळकर , उपमुख्य अधिकारी श्रीमती खिल्लारे आदींनी पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविक भाषणात रामराजे कापरे म्हणाले की, शहराच्या पाणीपुरवठा योजनेत ३८ कोटी रुपयांची वाढीव तरतूद झाली असून त्यातून ९५०० पाणी मीटर बसवण्यात येत आहेत. ८४ किलोमीटरची जलवाहिनी हद्दवाढ झालेल्या भागांमध्ये बसविण्यात येत आहे .इतरही कामे करण्यात येत आहेत.

आपल्या भाषणात आमदार संजय रामुलकर पुढे म्हणाले की १०८ कोटींचा रस्ते कामांचा प्रस्ताव येत्या दोन–तीन दिवसात मंजूर होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संवेदनशील मुख्यमंत्री असून धाडसी निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे .त्यांच्या व महायुती सरकारच्या सहकार्यामुळेच इतक्या मोठ्या प्रमाणात आपण विकास कामे खेचून आणू शकलो. आमचे मार्गदर्शक केंद्रीय मंत्री प्रतापरावजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार संघाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणता आला. विविध जाती धर्मांच्या उत्कर्षासाठी विविध महामंडळे स्थापण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला आहे तो सर्वांना लाभकारक ठरेल.

शहरातील बेघरांसाठी फ्लॅट सिस्टीमची घरे मोठ्या प्रमाणात बांधून देण्याची योजना कार्यान्वित करत आहोत , असे सांगून आमदार रायमुलकर म्हणाले की, यासाठी शासन अडीच लाख रुपये देणार असून आठ ते दहा लाखाचे कर्ज गरजूंना उपलब्ध होईल. त्याची हमी नगरपालिका घेणार आहे. बेघर कुटुंबांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेनेचे शहराध्यक्ष जयचंद बाठीया यांनी केले.